‘रा. प. महामंडळा’चा नाशिक प्रदेश स्वतंत्र

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राज्य परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर विभागातून नाशिक प्रदेश घटस्थापनेपासून (२२ सप्टेंबर) स्वतंत्र झाला आहे. यासंदर्भातील अधिसूचना २५ ऑगस्ट रोजी निघाली होती. राज्यात आता पूर्वीसारखेच सहा प्रादेशिक कार्यालये अस्तित्वात आले आहेत.

नाशिक प्रदेशांतर्गत नाशिकसह धुळे-जळगाव व अहिल्यानगर या चार जिल्ह्यांचे कामकाज चालणार आहे. तर छत्रपती संभाजीनगर प्रदेशात आता सात जिल्हे राहणार आहेत. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड व परभणी हे सात जिल्हे राहणार आहेत. परभणी विभागामध्येच हिंगोली जिल्हा समाविष्ट असल्याने छत्रपती संभाजीनगर प्रदेशात सात विभाग येतात, अशी माहिती सिडको येथील कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मिळाली.

यापूर्वी सिडको बसस्थानकानजीकच्या प्रशासकीय कार्यालयांर्तगतच नाशिक प्रदेशही जोडलेला होता. यासंदर्भाने केंद्रीय पथकाने तीन नियंत्रण समित्या नियुक्त केल्या होत्या. त्यातून कामकाजाची चाचणी केली. त्यातून नाशिक प्रदेश स्वतंत्र करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भाने २५ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाला पत्र पाठवून सूचना देण्यात आली. त्यानंतर २२ सप्टेंबरपासून प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाली. त्यानुसार प्रादेशिक व्यवस्थापक, सांख्यिकी अधिकारी व प्रादेशिक अभियंता या पदांच्या माध्यमातून कामकाज सुरू झाले आहे.

पुरातून चौघांच्या सुटकेसाठी खासदार उतरले छातीभर पाण्यात

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : परंडा तालुक्यातील वडनेरमध्ये दोन वर्षांचे एक मूल, आजी आणि त्या मुलाचे आई- वडील असे पाच जण २४ तास पाण्यात अडकले होते. यांची सुटका करण्यासाठी लष्करी दल आले. पण त्यांची बोट सुरूच होईना. त्यामुळे बांधलेली दोरी सोडवून या जवानांसह अडकलेल्या चौघांचे प्राण वाचविण्यासाठी गावकरी पुढे सरसावले. यात अग्रेसर होते खासदार ओमराजे निंबाळकर. रात्री पाण्यात उतरुन एका झाडात ओंडका अडकवून पोहता येणाऱ्या सहा- सात जणांबरोबर बोटीची दोरी ओढून छातीभर उंच पाण्यातून सर्वांना बाहेर काढले. या खासदारांच्या कृतीचे धाराशिवसह मराठवाड्यात कौतुक होत आहे.

ओमराजे निंबाळकर हा नेताच मुळात लढवय्या वृत्तीचा असल्याने संकटात धावून येतो अशी प्रतिक्रिया उमटत आहे. दोन दिवसापूर्वी भूम तालुक्यात एक तलाव फुटला होता. याच साखळी बंधाऱ्यातील दुसरा तलावही फुटेल अशी शेतकऱ्यांची तक्रार होती. त्याची ही पाहणी ओमराजे यांनी केली. ‘सर्वसामान्यांमध्ये मिळसणारा’ अशी ओमराजे यांची प्रतिमा आहे.

खासदार ओमराजे यांच्या साहसाचे कौतुक

कोणाचाही दूरध्वनी येवो, तो उचलून त्याला समाधान वाटेल असे बोलणारा नेता अशी त्यांची धाराशिव जिल्ह्यात प्रतिमा आहे. वडील पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येनंतर राजकारणात आलेले ओमराजे निंबाळकर तेव्हा अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्गाला शिकत होते. तेथून आल्यानंतर तेरणा साखर कारखान्यातून त्यांनी राजकारणाला सुरुवात केली. २००७ मध्ये त्यांनी तेरणा साखर कारखाना निवडणुकीमध्ये यश मिळवले. तेव्हा डॉ. पद्मसिंह पाटील यांची या कारखान्यावर पकड होती. या साखर कारखान्यातील अनेक गैरप्रकार तेव्हा काँग्रेसचे नेते नानासाहेब पाटील यांनी चव्हाट्यावर मांडायला सुरुवात केली होती. याचा लाभ ओमराजे निंबाळकर यांना झाला. तेरणा साखर कारखान्यात विजय मिळविल्यानंतर त्यांनी २००९ च्या निवडणुकीमध्ये राणा जगजीतसिंह पाटील यांचा पराभव केला. पुढे २०१९ आणि २०२४ मध्ये ते खासदार म्हणून निवडून आले. हे सारे करत असताना गावागावातील तरुणांशी त्यांनी संपर्क वाढवला. एखाद्या गावात तरुण मुले क्रिकेट खेळत असतील तर त्यात सहभागी व्हायचे. गावात एखाद्याने कीर्तना बोलावले तरी जायचे आणि येणाऱ्या प्रत्येकाचा दूरध्वनी घेत होईल तेवढी मदत करायची असा त्यांच्या कामाचा भाग.

वडनेर येथील प्रसंगाविषयी बोलताना ओमराजे निंबाळकर म्हणाले, ‘ हेलिकॉप्टरने २७ जणांना बाहेर काढल्यानंतर ते खराब हवामानामुळे परत येऊ शकले नाही. जवानांची एक चमू घटनास्थळी पोहचला होता. वडनेरची स्थिती पाहण्यासाठी सायंकाळी ६.३० च्या सुमारास पोहचलो होते. तेरणा नदीला पाणी आल्यावर शेतातून मोटारी काढण्यासाठी पूर्वी छातीएवढ्या पाण्यात आम्ही उतरत होतो. चांगले पोहता येत असल्याने आपण मदत करू, असा विश्वास होता. चंद्रकांत नाराण चौधरी, श्रीकृष्ण चंद्रकांत चौधरी, भामाबाई नारायण चौधरी, व शंभू श्रीकृष्ण चौधरी यांचे जीव वाचले.

जालन्यात आज धनगर आरक्षणासाठी मोर्चा

दीपक बोऱ्हाडे यांच्या उपोषणाचा आठवा दिवस

लोकसत्ता वार्ताहर

जालना : राज्यातील धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याच्या मागणीसाठी जालना येथे दीपक बोऱ्हाडे यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा मंगळवारी सातवा दिवस होता. या मागणीसाठी धनगर समाज बुधवारी (दि. २४) सकाळी १० वाजता गांधी चौकातून मोर्चास सुरुवात होईल. जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

उपोषणकर्ते बोऱ्हाडे यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितले की, या उपोषणाकडे शासन गांभिर्याने पाहण्यास तयार नाही. बुधवारी निघणाऱ्या मोर्चानंतर आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट करण्यात येईल. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाची मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. फडणवीस यांनी राज्यात सत्ता आल्यावर मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यात येईल, असे सांगितले होते. त्यांनी आता तरी आपला शब्द खरा करून दाखविला पाहिजे. आमची मागणी संवैधानिक असल्याने ती पूर्ण केली पाहिजे.

धनगर समाजास आता नेता उरलेला नसून, सर्व नेते संपल्याचे सांगून बोऱ्हाडे म्हणाले, बुधवारच्या मोर्चात स्वतःस नेते समजणारे यांनी सामान्य जनता म्हणून सहभागी व्हावे. तसे झाले तर आम्हाला त्याचा आनंद होईल. धनगर समाज बांधव, महिला, विद्यार्थी- विद्यार्थिनी या मोर्चात सहभागी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

बीडमध्ये दुसऱ्या दिवशीही पूर

लोकसत्ता वार्ताहर

बीड : जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी नद्यांना पूर आल्याने बीड जिल्ह्यातील अनेक गांवाचा संपर्क तुटलेला होता. गेल्या काही तासात पावसाची संततधार सुरूच होती. परिणमी मांजरा, माजलगाव धरणाचे दरवाजे उघडण्यात आले. माजलगाव प्रकल्पाचे ११, मांजराचे सात, अप्पर कुंडलीकाचे तीन दरवाजे उघडून नदीपात्रात पाणी सोडण्यात आले. मंगळवारी पाचव्यांदा बिंदुसरा धरण भरुन वाहिले.

शिरूर कासार तालुक्यातील येवलवाडी ते डोंगर किनी दरम्यानचा फुल वाहून गेल्याने दोन गावांचा संपर्क तुटला होता तर खोकर मोहा येथील पाझर तलाव फुटल्याने परिसरातील शेताचे नुकसान झाले. प्रशासनाने बचाव कार्य राबवत पंधराशे लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले सर्वाधिक बचाव कार्य आहे तेज आणि माजलगाव मध्ये राबविण्यात आले.

आष्टीमधील करेवाडी येथे बाळासाहेब आश्रुबा सांगळे यांचा शेतात विजेचा धक्का लागून मृत्यू झाला.

मंत्री गिरीश महाजन यांनी बीड तालुक्यातील नांदूर हवेली येथे पूरग्रस्त भागाची पाहणी केली या ठिकाणी सिंदफणा नदीला पूर आल्यामुळे नागरिकांच्या घरामध्ये पाणी घुसले होते. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांना तात्काळ मदतीसाठी आश्वासित केले.

पोहनेर गावाला रात्रीपासून पाण्याचा वेढा घातल्याने या गावचा संपर्क रात्रीपासून तुटलेला होता. सायंकाळी पाचच्या दरम्यान आमदार धनंजय मुंडे यांनी केली गावात पाहणी करून नागरिकांना मदतीचे आश्वासन दिले.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीड मधील चौसाळा भागात जाऊन पाहणी केली. त्यांनी सरकारला मदतीसाठी भाग पाडणार असल्याचे सांगितले.

जालन्यात पुन्हा पावसाची हजेरी

लोकसत्ता, वार्ताहर

जालना : जालना जिल्ह्यातील अनेक भागात मंगळवारीही पावसाने हजेरी लावली. मंगळवारी सकाळी साडेआठ वाजता संपलेल्या चोवीस तासांमध्ये जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ६९ मि.मी. पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल (३२ मि.मी.) पाऊस अंबड तालुक्यात झाला. जालना, बदनापूर आणि परतूर या तालुक्यांतही चांगला पाऊस झाला.

जिल्ह्यात यावर्षीच्या पावसाळ्यात आतापर्यन्त सरासरी ७६० मि.मी. पाऊस झाला. हा पाऊस जिल्ह्याच्या अपेक्षित वार्षिक पावसाच्या (६०३ मि.मी.) तुलनेत १२६ टक्के आहे. घनसावंगी तालुक्यात सर्वाधिक पाऊस (९०८ मि.मी.) झाला आहे. घनसावंगी तालुक्यात झाला आहे. जालना ८०१ मि.मी., बदनापूर ७८३ मि.मी. मंठा ७०५ मि.मी., जाफराबाद ७११ मि.मी., परतूर ८०२ मि.मी., मंठा ७०५ मि.मी. आणि अंबड ७९६ मि.मी. याप्रमाणे अन्य तालुक्यांत पाऊस झालेला आहे.

अतिवृष्टीमुळे पीकांचे आणि जमिनीचे नुकसान झालेल्या जालना तालुक्यातील तसेच अन्य भागातील शेतकऱ्यांनी मंगळवारी स्थानिक आमदार अर्जुन खोतकर यांची भेट घेतली. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचे आश्वासन आमदार खोतकर यांनी दिले.

SJSB Multi-State Scheduled Coop.Bank **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** (मल्टी स्टेट शेड्युल्ड को ऑप.बँक)

“गगनभरारी”, शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर 413 007 फोन क्र.: 0217-274 1101 ते 05
ई-मेल : info@sjsbbank.com. वेबसाईट : www.sjsbbank.com

जाहीर ताबा नोटीस नियम 8(1)

(दि सेक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अन्वये)

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम 13(12) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम 13(2) अन्वये दि.03/07/2025 रोजी **कर्जदार- माऊली कलेक्शन प्रोप्रा.ज्ञानेश्वर उत्तमराव भांबळे, पत्ता- RH/15/20, शिव कॉलनी हौसिंग सोसायटी बालाजी नगर, छ.संभाजी नगर.**

जामीनदार - 1) श्री.जीवन गोविंदराव कदम 2) श्री. गणेश रोडूबा बरगट 3) सौ.अरुणा ज्ञानेश्वर भांबळे

यांना मागणी नोटीस पाठवून **रक्कम रु.10,81,728=14 (अक्षरी रुपये दहा लाख एक्याऐंशी हजार सातशे अठ्ठावीस, पैसे चौदा मात्र) आणि दि.01/07/2025 पासूनचे** देय असलेले पुढील व्याज व इतर खर्च अशी संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून 60 (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीस मिळूनही सदर उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उपरोक्त रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खालील सही करणार यांनी खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा **दिनांक-18/09/2025** रोजी दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 13(4) नियम 9 अन्वये **ताबा घेतलेला आहे.**

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

* परिशिष्ट *

तारण स्थावर मालमत्ता वर्णन

जामीनदार सौ.अरुणा ज्ञानेश्वर भांबळे यांचे नावावरील गट क्र.142 गाव शेंद्रा जहांगीर, तालुका व जिल्हा छ.संभाजी नगर, प्लॉट क्र.11 याचे क्षेत्र 186.45 चौ.मी. ही स्थावर रजि.गहाणखताने तारण असून, यांसी चतुःसीमा पुढीलप्रमाणे - पूर्वेस - प्लॉट क्र.10, पश्चिमेस - प्लॉट क्र.12, दक्षिणेस - गट क्र.142, उत्तरेस 9 मी.रुंदीचा रस्ता

सही/-
प्राधिकृत अधिकारी
सोलापूर जनता सहकारी बँक लि.
(मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप.बँक)

दिनांक : 18/09/2025
ठिकाण : शेंद्रा जहांगीर, ता.व जि.छ.संभाजी नगर,
(शिक्का)

Phoenix ARC

Phoenix ARC Private Limited

नोंदणीकृत कार्यालय: ३ रा मजला, वॉलेस टॉवर, (पूर्वी शिव बिल्डींग म्हणून ज्ञात असलेली), १३९/१४०/बी, सहार रोड आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवेचे क्रॉसिंग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७, दूर: ०२२-६८४९२४५०, फॅक्स: ०२२ – ६७४१२३१३,
सीआयएन: यू७१९०एमएच२००७पीटीसी१६८३०३; ई-मेल : info@phoenixarc.co.in; संकेतस्थळ : www.phoenixarc.co.in

ई-लिलाव वजा विक्रीसाठी जाहीर सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनेंन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सामान्य जनतेला आणि विशेषत: कर्जदार/ हमीदार/ गहाणदार ह्यांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की खाली नमूद मालमत्ता फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड ह्यांच्याकडे गहाण ठेवण्यात आली असून मोतीलाल ओसवाल होम फायनांस लिमिटेड (पूर्वी अस्पायार होम फायनांस कॉर्पोरेशन लिमिटेड – अभिहास्तांकन कर्ते म्हणून पूर्वी ज्ञात असलेले) ह्यांच्याद्वारे अभिहास्तांकित करण्यात आल्यानुसार गहाण ठेवण्यात आली होती ज्यांची सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सरफेसी कायद्याच्या तरतुदीनुसार खाली तपशिलामध्ये देण्यात आल्यानुसार देणी आणि त्यावरील व्याज, भार आणि शुल्क इत्यादीच्या वसुलीसाठी “जसे आहे जेथे आहे, जसे आहे तसे आहे आणि कोन्त्याहिया आधाराशिवाय तत्वावर” “ऑन लाईन ई-लिलाव” विक्री पुढील संकेतस्थळाद्वारे करण्यात येणार आहे: www.phoenixarc.co.in.

ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ : दिनांक: १६-१०-२०२५ स. ११.०० वा. पासून दु. ०२.०० वा. पर्यंत (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह) .

अनु. क्र.	कर्जदार (रां) / हमीदार (रां) / कर्ज खाते	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम	स्थावर मालमत्तेचे वर्णन	राखीव मूल्य, इरठे आणि इरठे जमा करण्यासाठी शेवटचा दिनांक
१	**एलएएन: एलएक्सएयूआर००३१६-१७००३९१६१ शाखा: औरंगाबाद, कर्जदार: सोमनाथ सुर्यकांत खंडागळे सह-कर्जदार: सुर्यकांत रामभाऊ खंडागळे, हमीदार:**	रु. ७२०,९१८/- (रुपये सात लक्ष वीस हजार नऊशे अठरा मात्र) करीता ०७-१२-२०२०	मिळकत क्र. ४३३, एस क्र. ३०१, जयसिंग नगर, हनुमान मंदिराजवळ, गंगापूर, औरंगाबाद, महाराष्ट्र ४३११०९	**राखीव मूल्य: रु. ४५०,०००/-** (रुपये चार लक्ष पन्नास हजार मात्र) **इरठे: रु. ४५.०००/-** (रुपये पंचेचाळीस हजार मात्र) **इरठे जमा करण्यासाठी शेवटचा दिनांक : ११-१०-२०२५**

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती: १. लिलाव बोली दस्तऐवजातील पुढील अटी आणि शर्तीनुसार आणि त्यामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार केला जातो. बोलीदार आमच्या ई-लिलाव सेवा प्रदात्या, मेसर्स एआरसीए एमआरटी प्रायव्हेट लिमिटेडच्या वेब पोर्टल https://www.auctionbazaar.com/ ला भेट देऊ शकतात, बोली माहिती आणि समर्थनासाठी, ई-लिलावासाठी देवलेल्या सुरक्षित मालमत्तेची माहिती आणि ऑनलाइन सादर केला जाणारा बोली फॉर्म. इच्छुक खरेदीदार त्याच पोर्टलवर लिलावाच्या अटी आणि शर्ती आणि प्रक्रिया पाहू शकतात आणि वर उल्लेख केलेल्या वेब पोर्टलमध्ये उपलब्ध असलेल्या तपशीलांसह संदीप उखरडा रनित ९३७२७०५४५४ आणि मनीष रामसिंग परमार ९३७२७०५२३१ ईशान देव ८८२८२७३२३१ यांच्याशी संपर्क साधू शकतात आणि त्यांच्या सेंट्रलाइज्ड हेल्प डेस्कवर संपर्क साधू शकतात: + ९१ ८३७०९ ६९६९६, ई-मेल आयडी: contact@auctionbazaar.com. **२.** सर्व इच्छुक खरेदीदारांनी/बोलीदारांनी वर नमूद केलेल्या https://www.auctionbazaar.com/ या पोर्टलवर त्यांचे नाव नोंदणीकृत करणे आवश्यक आहे आणि वर नमूद केलेल्या तारखेला आणि वेळी ई-लिलावात सहभागी होण्यासाठी वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवणे आवश्यक आहे. **३.** ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोलीदारांना सुरक्षित मालमत्तेच्या राखीव किमतीच्या १०% परत करण्यायोग्य बयाणा रक्कम जमा करण्याची माहिती, पॅनकार्डच्या प्रती, कंपनीच्या बाबतीत बोर्ड ठराव आणि पत्त्याचा पुरावा यासह वर नमूद केलेल्या ईएमडी सादर करण्याच्या शेवटच्या तारखेला किंवा त्यापूर्वी सादर करावी लागेल. इच्छुक खरेदीदार/बोलीदारांना वर वर्णन केलेल्या प्रत्येक वस्तू/मालमत्तेसाठी स्वतंत्र ईएमडी सादर करणे आवश्यक आहे. **४.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतात किंवा लिलाव पुढे ढकलू शकतात. **५.** यशस्वी खरेदीदार/बोलीदाराला लागू कायद्यानुसार सुरक्षित मालमत्ता त्याच्या/तिच्या/तिच्या नावे हस्तांतरित/वितरित करण्यासाठी भरावे लागणारे कोणतेही वैधानिक देणी, कर, देय शुल्क, खरेदीच्या मोबदल्यावरील लागू जीएसटी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इत्यादी भरावे लागतील. **६.** इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी भार, लिलावात ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचे मालकी हक्क आणि सुरक्षित मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/देयके, वैधानिक देयके इत्यादींबद्दल स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. लिलावाची जाहिरात फिनिक्सची कोणतीही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व करत नाही आणि करणार नाही. फिनिक्सचा प्राधिकृत अधिकारी कोणत्याही त्रयस्थ-पक्षाच्या दाव्यांसाठी/हक्कांसाठी/देयकेसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. **७.** संभाव्य/इच्छुक बोलीदाराने अशी हमी द्यावी की तो/ती दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम २९ (ए) च्या तरतुदींनुसार अपात्र नाही आणि केवायसी कागदपत्रांसह असे हमीपत्र सादर करण्यात अयशस्वी झाल्यास, त्याची/ तिची बोली आपोआप अपात्र ठरेल किंवा तो/ती बोली नाकारली जाईल.

ठिकाण: औरंगाबाद
दिनांक: २४.०९.२०२५
सही/- प्राधिकृत अधिकारी
फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड, फिनिक्स ट्रस्ट एफव्हाय १९-२१

IndiaShelter Home Loans

इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट नं. 15, सहावा मजला, सेक्टर - 44, इंस्टीट्यूशनल एरिया, गुरुग्राम हरियाणा - 122002

शाखा कार्यालय:- इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, प्लॉट क्रमांक ९५, पहिला मजला, सनशाईन बिल्डिंग, नाथ प्रागणे सोसायटी, महाराष्ट्र बँकेच्या बाजूला, शिवाजी नगर रोड, गारखेडा, औरंगाबाद ४३१००५

सांकेतिक / प्रत्यक्ष ताबा सुचना अचल संपत्ती करीता

ज्याअर्थी, सिक्युरिटाईजेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनैंशियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऐक्ट 2002 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे इंडिया शेल्टर फायनान्स कार्पोरेशन लि., अधिकृत अधिकारी आहे. तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स 2002 चे सेक्शन 13(12) नियम च्या सोबतच वाचले जाणारे नियम 3 च्या अंतर्गत कर्जदार संपत्ती / हमीदार यांना डिमांड नोटिस दिनांक खालील नमुद आहे देऊन सुचनेत दर्शविलेली रक्कम व्याज सह ही सुचना प्राप्तीनंतर 60 दिवसांच्या आत कर्जाची भरपाई करण्याच्या उद्देशाने सुचना मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली होती. ज्याअर्थी संपत्ती / हमीदार यांचा मालक आणि इतर कर्जदार रक्कमेची भरपाई करण्याकरीता असमर्थ सिध्द ठरल्यामुळे कर्जदार तसेच आम जनतेला याव्दारे सुचना देण्यात येते की, खालील दिलेल्या 13(4) सह वाचल्या जाणा-या ॲक्ट कार्य क्र. 8 आणि 9 च्या अंतर्गत प्रत्येक खात्यावर नमूद केलेल्या तारखांवर खालील हस्ताक्षरकर्त्याने खालील दिलेल्या संपत्तीचा सांकेतिक ताबा घेतला आहे. विशेष करुन कर्जदार / गहाणदार / जमानतदार तसेच आम जनतेला या व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, व्याज सह इतर प्रभाराधिन राहील.

अ. क्र.	कर्जदार / जमानतदारचे नाव (संपत्तीचे मालक) आणि कर्ज खाते क्रमांक	चार्ज / गहाणदार संपत्तीचे वर्णन (संपत्तीचा सर्व भाग व तुकडा समाविष्ट)	मागणी सूचनेची तारीख, देय रक्कम मागणी सूचनेच्या तारखेनुसार
1.	**तृप्ती नगरिया आणि हेमल नगरिया पत्ता: प्लॉट नं.18, सर्व्हे नं.88/2, बीएसएनएल ऑफिसच्या मागे, महाराणा प्रताप नगर, जालना रोड मौजे-सिल्लोड ता.- सिल्लोड जि. औरंगाबाद-431112 कर्ज खाते क्र. LA43VLLONS000005095421**	सर्व भाग आणि तुकडा प्लॉट क्रमांक १८ भाग, सर्वे क्रमांक ८८/२, एम सी सर्वे क्रमांक ६७३/१, जुने एम सी मालमत्ता क्रमांक ३१५९ आणि नवीन एम सी मालमत्ता क्रमांक ६७३/१, एरिया क्षेत्रफळ ६६.९१ चौ. मीटर मौजे- सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद ४३१११२ सीमा:- पूर्वेकडे:- सर्वे क्रमांक ८८/२ मधील प्लॉट क्रमांक १७, पश्चिमेकडे:- श्री. भरत कुमार यांच्या त्याच प्लॉटमधील उर्वरित भाग, उत्तरेकडे:- रस्ता, दक्षिणेकडे:- श्री. अग्रवाल यांचे घर.	**मागणी सूचनेची तारीख** 11.04.2025 **रु.** 2890571.10/- (रुपये अठ्ठावीस लाख नव्वद हजार पाचशे एकाहत्तर व दहा पैसे फक्त) 10 एप्रिल 2025 रोजी व्याजासह आणि इतर शुल्क आणि खर्चासह 11 एप्रिल 2025 पासून देय तारखेपर्यंत. **सांकेतिक ताब्याची तारीख** 19.09.2025 सांकेतिक ताबा

ठिकाण : महाराष्ट्र, दिनांक : 23.09.2025
इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, अधिकृत अधिकारी
कोणत्याही प्रश्नासाठी कृपया श्री. प्रकाश तांदुळकर (+91 7447426676) यांच्याशी संपर्क साधा.

motilal oswal Home Finance

मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परळ एसटी डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई-४०००२५,
सीएस: ८२९११८८९८९८ वेबसाइट: www.motilaloswalhf.com, ईमेल: hfquery@motilaloswal.com

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(१) अंतर्गत)

ज्याअर्थी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (औपचारिकपणे अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. म्हणून ओळखले जाते) चे अधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकार यांनी, सिक्युरिटायझेशन अंण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अंण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४, २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सहवाचता कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना नोटिसमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी खालील कर्जदारांना बोलावण्यासाठी येथे नमूद केलेल्या डिमांड नोटीस जारी केली आहे.

खालील कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाले आहेत, याद्वारे खालील कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सहवाचता कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा येथे नमूद केलेल्या तारखेला ताबा घेतला आहे.

अ. क्र.	कर्ज करार क्र./ कर्जदार/ सह कर्जदार/ जामीनदाराचे नाव	डिमांड नोटीस आणि थकबाकीची तारीख	ताब्यात घेतल्याची तारीख	स्थावर मालमत्तेचे वर्णन: मालमत्तेचा पत्ता समाविष्ट असलेले मालमत्तेचे ते सर्व तुकडे आणि पार्सल
१	**एलएक्सएमओडीएचयूएलई५२२२-२३०६५९९३०/ कर्जदार: लक्ष्मी माणिक कंडारे सह-कर्जदार: माणिक इस्माईल कंडारे**	दि. १४.०५.२०२५ रु. १३००९४४/- यासाठी	१८.०९.२०२५	अ. क्र. ६/१ भाग प्लॉट नं.८६, मोजमापे ७२ चौ.मी., मौजे चितोड, ता. आणि जिल्हा धुळे, रेणुका माता मंदिराजवळ, रमेशनगर चितोड येथे, धुळे, महाराष्ट्र-४२४००१
२	**एलएक्सएयूआर००११७-१८००५३७४२ / कर्जदार: दिवंगत विनोद रामकिसन बोडखे सह-कर्जदार: त्याचे कायदेशीर वारस कावेरी विनोद बोडखे यांच्याद्वारे**	दि. २४.०७.२०२५ रु. ७४८६१२/- यासाठी	२०.०९.२०२५	मिळकत क्र. २३१७, क्षेत्रफळ मोजमापे ३६० चौ.फूट, रांजणगाव ता. गंगापूर जिल्हा औरंगाबाद, ४३११३६ महाराष्ट्र
३	**एलएक्सएमओजेएएलजीएओ९२१-२२०६२४४३१/ एलएक्सएमओजेएएलजीएओ५५२३-२४०७१४४५७ / कर्जदार: अर्चना सुनील पाटील सहकर्जदार: सुनील शालिक पाटील**	दि. ०९.०७.२०२५ रु. १९३९९६८/- यासाठी	२०.०९.२०२५	जीपीएच क्र. ९४/२ (नवीन) जीपीएच क्र.- ९१/२ (जुने) मौजे निंभोरा बु येथे, ता. भुसावळ, जि. जळगाव ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, निंभोरा बीके ४२५३०७ जळगाव महाराष्ट्र